REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.

खालील पत्त्यावर चौकशी करावी.

व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास', पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.

वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हशील माफ )
किरकोळ किंमत
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.


संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ | पुणें, बुधवार, तारीख १३ एप्रिल, १९३८ | अंक १५

FOR
SAFETY, ECONOMY
AND
DURABILITY
Consult
**V. G. & Sons**
ELECTRICAL and RADIO ENGINEERS
AND
LICENSED ELECTRICAL CONTRACTORS
Laxmi Road, Ganapati Chowk, POONA.

*For All Medicinal Requisites*
— TRY —
**N. MAHADEV & Co.**
DISPENSING CHEMISTS
AND
DRUGGISTS
City Post Office Corner POONA 2

गंधर्व हीरो नटवर्य
लोंढे
यांचीं ठसकेदार पण गोड पदें
ऐकण्यासाठीच आणि
लीलेच्या गोड गायनानें
गुंग होण्यासाठी आजच
मिनर्व्हांत चला.



( वेस्टर्न इंडिया थिएटर्स लि. च्या
खास व्यवस्थेखालील
रे-मार्केट जवळ पुणें ) मिनर्व्हा ( टे. नं. ३९८
दररोज दोन खेळ : ६॥ व १० वा.
बुधवार ता. १३ ते शुक्र. ता. १५

ईस्टरच्या सुट्टीनिमित्त
शुक्रवार ता. १५ एप्रील
१९३८ रोजीं खास खेळ
दु. ३॥ वाजतां
२ रा आठवडा

शालिनी सिनेटोनचा मराठी
बोलपट
# का न्हो पा त्रा
भूमिका:—लीला, लोंढे
दिनकर दर (कामण्णा),
चिंतामणराव कोल्हटकर,
दानवे, शांताबाई, इंदुबाला
दिग्दर्शक:—भाल.जी.पेंढारकर

## विविध माहिती

**कपाशीचा वाढता उठाव-गिरण्यांची चलती**

१ सप्टेंबर, १९३७ ते २८ फेब्रुवारी, १९३८ ह्या सहा महिन्यांच्या मुदतींत सर्व हिंदी गिरण्यांत मिळून १४ लक्ष, ८५ हजार गाठी कपास खपली. गेल्या सालच्या तत्सम मुदतींत, ब्रह्मदेश धरून, हिंदी गिरण्यांचा कपाशीचा उठाव १२ लक्ष, ७५ हजार गाठी, इतकाच होता.

**विटांचा धंदा**

इंग्लंडमध्यें दर वर्षी ६०० कोटि विटा तयार होतात. तीन लक्ष लहान घरें बांधावयास त्या विटा पुरतील. आधुनिक पद्धतीच्या विटा करण्याच्या धंद्यांत जमीनींतून माती खणून काढण्यापासून पक्क्या विटा भट्टींतून बाहेर पडेपर्यंत एकूण सर्व क्रिया यंत्रें करतात; त्यांस माणसाचा हात लागत नाहीं.

**आर्थिक मंदीच्या निवारणार्थ ४०० कोटि रुपयांचा खर्च**

आर्थिक परिस्थितीच्या मंदावलेल्या चक्रास पुन्हां गती देण्यासाठी ४०० कोटि रुपये रस्ते, घरें इत्यादि कामांवर खर्चण्यांत यावे अशी योजना अमेरिकेचे प्रेसिडेंट, मि. रूझवेल्ट, ह्यांनीं कायदेमंडळापुढें ठेवली आहे.

**तांब्याच्या ब्रिटिश नाण्यांची किंमत**

ग्रेटब्रिटनमध्यें प्रचलित असलेल्या तांब्याच्या नाण्यांची एकूण किंमत अजमासें १३ कोटि रुपये आहे.

**हिंद-ब्रिटन व्यापारी करार**

हिंदुस्थान आणि ग्रेट ब्रिटन ह्यांच्यामधील व्यापारी कराराच्या अटींची वाटाघाट अजून चालूच आहे. ह्यासंबंधीं लँकेशायरच्या कारखानदारांचें शिष्टमंडळ ह्या देशांत येण्याचा बराच संभव आहे.

**वाढता जागतिक लष्करी खर्च**

जगांतील राष्ट्रांचा एकूण लष्करी खर्च १९३७ सालीं ३,२०० कोटि रुपये झाला. १९१४ सालीं हा आंकडा १,१४५ कोटि होता.

**जर्मनीचें आर्थिक बल वाढलें**

हिटलरनें ऑस्ट्रियाचें नाझीकरण केल्यानें जर्मनीचें आर्थिक बल वाढलें आहे. ऑस्ट्रियाचे उद्योगधंदे, लोखंडाच्या खाणी, जंगलें, सुवर्णनिधी, हीं हिटलरच्या हातीं आलीं आहेत. ह्या सर्व साधनांचा व सामुग्रीचा उपयोग तो जर्मनीचें वर्चस्व मध्य युरोपांत स्थापण्याकडे करणार हें स्पष्ट आहे.

**बोलपटाचा बोलबाला**

डिस्नेचा "स्नो व्हाइट" हा चित्रपट न्यूयॉर्क शहरांतील सर्वांत मोठ्या सिनेमागृहांत प्रथमच जेव्हां लागला तेव्हां पांच आठवड्यांत तो ८ लक्ष लोकांनीं पाहिला आणि त्यासाठीं १५ लक्ष रुपये खर्च केले. म्हणजे हा बोलपट तयार करण्यास लागलेल्या खर्चापैकीं निम्मे पैसे तेवढ्यांतच वसूल झाले.

**श्रीमान ब्रिटिश लोक**

प्रत्येकी तीन लक्ष रुपयांच्या वर प्राप्ती असलेले असे १,२३१ इसम ग्रेट ब्रिटनमध्यें आहेत. त्यांच्या वार्षिक प्राप्तीची एकूण बेरीज ८२ कोटि रुपये होते.

**बार्शी लाइट रेल्वेचें वाढतें उत्पन्न**

१ ऑक्टोबर, १९३७, ते ७ एप्रिल, १९३८ ह्या मुदतींत बार्शी लाइट रेल्वेचें उत्पन्न ९ लक्ष ७५ हजार रुपये झालें. पूर्वीच्या वर्षांतल्या त्या मुदतीच्या उत्पन्नाचा आकडा ७ लक्ष २८ हजार रुपये असा होता.

**टोलच्या उत्पन्नापेक्षां मोटारीवरील कर किफायतशीर**

टोल नाकीं बंद करून मोटारींवर कर आकारण्यास मुंबई सरकारनें १९३६-३७ मध्यें प्रारंभ केला. टोल नाक्यांचें उत्पन्न भरून येण्यास २६ लक्ष, ५७ हजार रुपये पुरले असते, परंतु मोटारींवरील करापासून सरकारास १९३६-३७ सालीं ३४ लक्ष, ५३ हजार रुपये मिळाले. ७ लक्ष, ९६ हजारांचा हा वाढावा प्रांतिक रोड फंडाकडे वर्ग करण्यांत आला आहे.

**बँकांस सुट्टी**

शुक्रवार, शनिवार व सोमवार, ता. १५,१६ व १८ एप्रिल रोजीं गुडफ्रायडे व ईस्टर ह्यांचे निमित्त बँका बंद राहातील.

**ट्रेझरी बिलांवर १ रु. ८ आ. १० पै व्याज**

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत २ कोटि रुपयांची ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १ रु. ८ आ. १० पै इतका पडला.

**तारेचे नवे दर**

हिंदुस्थानांतून बाहेर साम्राज्यांतर्गत देशांस तार करण्यास लागणाऱ्या दरांत दुरुस्ती करण्यांत आली आहे. हे नवे दर २५ एप्रिल, १९३८ पासून अमलांत येतील. साध्या तारेंतील प्रत्येक शब्दास १३ आणे व अर्जंट तारेंतील प्रत्येक शब्दास १ रुपया १० आणे पडतील.

**५ कोटि फूट लांब शैक्षणिक फिल्म्स**

जर्मनीमधील शाळांतून शैक्षणिक चित्रपट दाखविण्यासाठी सिनेमाचीं २२,३६० यंत्रें उपयोगांत आणलीं जातात. एकूण ५ कोटि फूट लांबीच्या शैक्षणिक फिल्म्स तयार आहेत.

**दूध आणि दारू**

ग्रेटब्रिटनमध्यें गेल्या वर्षी दुधापेक्षा दारूचा खप अधिक झाला. दूध ८७ कोटि गॅलन खपलें, पण दारूचा खप ८८½ कोटि गॅलन इतका झाला.

**ऑस्ट्रियनांस बंदी**

ऑस्ट्रियामधून ग्रेट ब्रिटनमध्यें आसरा मिळेल ह्या आशेनें दाखल होणाऱ्या तेथील नागरिकांस परत पाठविण्याचें काम चालू आहे.

**कलकत्ता विश्वविद्यालयाचा व्याप**

कलकत्ता विश्वविद्यालयाच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं निरनिराळ्या कॉलेजांत ३,००० विद्यार्थी शिकत आहेत. विश्वविद्यालयास जोडलेल्या कॉलेजांची संख्या ६४ असून त्यांत सुमारें ३३ हजार विद्यार्थी आहेत. १,४०० हायस्कुलांत मिळून ३ लक्ष, ४० हजार विद्यार्थ्यांचें शिक्षण चालू आहे. गेल्या वर्षी मॅट्रिकचे परीक्षेस ५० हजार उमेदवार बसले होते.

**मद्रास इलाख्यांतील साखर कारखाने**

मद्रास इलाख्यांत एकूण साखरेचे दहा कारखाने आहेत.

**शेतीचें विद्युत्करण**

अमेरिकेंतील ११½ लक्ष शेतांमधील हरतऱ्हेचें काम विजेच्या सहायानें यंत्रांनीं केलें जातें. तेथील शेतकऱ्यांच्या जीवनाचें पूर्णपणें अधुनीकरण झालें आहे. सर्व देशभर वीज उपलब्ध करून देण्याची अमेरिकन सरकारची खटपट आहे.

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | रुपये किंमत |
|---|---|
| २७-३-३८ ते २-४-३८ | २२,९७,१०० |
| ३-४-३८ ते ९-४-३८ | २१,७४,५६३ |
| २१-९-३१ ते ९-४-३८ | ३,१२,९२,४२,५९९ |

अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| | | पृष्ठ |
| १ | विविध माहिती | ... १७० |
| २ | सहकार आणि सावकार | १७१ |
| ३ | दरराष्ट्रीय हुंडीचा व्यवहार | १७२ |
| ४ | स्फुट विचार | ... १७३ |
| | हिंदुस्थान सरकारच्या खर्चांत काटकसर–असेंब्लींत प्रांतविरील कराचें बिल–फ्रान्समध्यें आणीबाणीचा प्रसंग–फ्रेंच सरकारची सप्तवार्षिक योजना– | |
| ५ | कापडाच्या गिरण्यांतील कामगारांचें वेतन | ... १७४ |
| ६ | वाढत्या लोकसंख्येचें पोषण कसें होणार ! | १७५ |
| ७ | प्रांतावरील कराची गळती | १७६ |
| ८ | प्रधानांचा प्रवास खर्च | १७६ |
| ९ | प्रांतिक सरकारांचें अवकाशी उत्पन्न | ... १७६ |
| १० | शहरांची वाढ–लंडनचें उदाहरण | १७७ |
| ११ | भिमथडी व इंदापूर को. यूनियन | ... १७८ |
| १२ | झाराकर टेलरिंग कॉलेज, दादर | ... १७९ |
| १३ | निवडक बाजारभाव | ... १७९ |

अर्थ

बुधवार, ता. १३ एप्रिल, १९३८

## सहकार आणि सावकार

"सहकारी संस्थांस ज्या सवलती सरकारनें दिल्या आहेत, त्या आम्हांला ( सावकारांस ) मिळाल्या म्हणजे आम्हींहि त्या संस्थांप्रमाणें व्याजाचे हलके दर व इतर बाबती ह्यांची समाधानकारक व्यवस्था ठेवूं आणि आज तसें पाहिलें असतां आम्हीं त्यांचेप्रमाणें शेतकऱ्यांस जरूर असलेलें भांडवल पुरवण्याची आर्थिक कामगिरी बजावीतच आहों" ह्या आशयाचे उद्गार दिल्लीचे धनाढ्य कारखानदार, लाला श्रीराम, ह्यांनीं हिंदी व्यापारी मंडळाच्या फेडरेशनचे सभेंत काढल्याचें प्रसिद्ध झालें आहे. प्रांतिक सरकारांनीं सावकारांच्या व्यवहारांचें नियंत्रण करण्यासाठी केलेल्या कायद्यांचा निषेध व्यक्त करणारा एक ठराव त्या परिषदेपुढें आला होता, पण त्यावर तीव्र मतभेद उत्पन्न झाल्याकारणानें शेवटीं तो मागें घेण्यांत आला. त्या ठरावावरील चर्चेंत साधक-बाधक विचार प्रकट करणारीं भाषणें झालीं. त्यांमध्यें लाला श्रीराम ह्यांनीं वर निर्दिष्ट केलेला युक्तिवाद पुढें मांडला. सावकारांनीं असें काय पाप केलें आहे कीं त्यांचेवर कायद्यानें निर्बंध घातले जावे आणि सहकारी चळवळीचें असें काय पुण्य आहे कीं ती त्या नियंत्रणापासून मुक्त असावी ? ह्या अर्थाचे प्रश्न वारंवार विचारले जातात. त्यांच्या मुळाशीं अज्ञान व भ्रामक कल्पना असतात, त्यांचें निराकरण होणें आवश्यक आहे. सहकारी संस्थांच्या अनेक सभासदांचीहि अशीच समजूत असल्यानें हें निराकरण अत्यंत अगत्याचें आहे. सहकारी पतपेढी किंवा बँक हा एक प्रकारचा सावकारच आहे आणि त्या संस्थांत कांहीं विशेष असेल तर तो सरकारी सहायाचा परिणाम आहे, असा युक्तिवाद सावकारांचे बाजूनें पुढें येतो. आमच्या नाठाळ कुळांची थकबाकी सरकारनें सहकारी पेढ्यांच्या कर्जाप्रमाणें वसूल करून द्यावी म्हणजे आम्हींहि आपले व्याजाचे दर उतरवतों कीं नाहीं तें पहा; तसेंच, स्टँपच्या कराची व रजिस्ट्रेशन फीची माफी आम्हांस द्या कीं आम्हींहि शेतकऱ्यांस सवलतीनें वागवतों कीं नाहीं हें तुम्हांस दिसेल, असें सावकारी वर्गाची तरफदारी करणारांचें नेहमी म्हणणें असतें, त्याचाहि विचार करणें युक्त आहे.

कांहीं सावकार सज्जन असतात, त्याप्रमाणें कांहीं सहकारी पतपेढ्या वाईट असतात, हें प्रारंभींच सांगून टाकलें पाहिजे. म्हणजे ह्या दोहोंमध्यें मूलग्राही तात्त्विक व व्यावहारिक महत्त्वाचें मोठें अंतर आहे, हें ध्यानांत येण्यास सहाय होईल. सावकार आपला पैसा व्याजी लावून त्या धंद्यांत मिळणाऱ्या नफ्यावर चरितार्थ चालवतो. त्याचें भांडवल बेताचें असतें आणि होणाऱ्या व्यवहारावर पुरेसा फायदा पडावा ह्याकरितां त्यास जबर व्याज आकारावें लागतें. व्याज वेळेवर न येण्याची आणि कर्जफेड न होण्याचीहि नेहमी भीति त्यास असते. ह्या परिस्थितींत सामान्य सावकारी व्यवहार सरळ आहेत असें जरी मानलें तरी गरीब व अशिक्षित शेतकरी आणि कारागीर ह्यांच्या हिताच्या दृष्टीनें भांडवल पुरवण्याची दुसरी, स्वस्त व अधिक सोयीची व्यवस्था निष्कारण ठरत नाहीं, एवढेंच नव्हे, तर ती अत्यंत आवश्यक अशी भासते. दरिद्री व अडाणी शेतकरी व्यक्तिशः असहाय असतो. त्यास स्वतःची पत नसते आणि जरूर असलेल्या पण कर्जाऊ घ्याव्या लागणाऱ्या भांडवलावर सावकारांस त्यास जबर व्याज द्यावें लागतें. असे अनेक शेतकरी एकत्र होऊन त्यांनीं संयुक्त व अनियमित जबाबदारीवर जुटीनें व्यवहार करावयाचें ठरवल्यास त्यांची पत वाढून त्यांस धंदा कमी खर्चांत करणें शक्य होतें. धंद्यांत होणारा फायदा, नफा म्हणून व्यक्तिशः वांटून न टाकतां हे संयुक्त झालेले सहकारी शेतकरी सभासदांच्या सामुदायिक हितासाठी त्याचा उपयोग करतात. सहकारी संस्थेंत स्वार्थास परार्थाची आणि वैयक्तिक हितास सामुदायिक सेवेची जोड देण्यांत येते. एकाचें देणें देण्याची नैतिक व व्यवहारिक जबाबदारी बाकीचे सर्व सभासद उचलतात आणि व्यक्तीच्या हितास सार्वत्रिक हिताचा बळी देत नाहींत. सहकारी संस्थांचे व्यवहार व हिशेब व्यवस्थित असण्याची योजना केलेली असते आणि सावकारी व्यवहारांप्रमाणें ते गुप्त असत नाहींत. गरीब व्यक्तींच्या अडचणींचा व अज्ञानाचा फायदा घेतला जाण्याचा आणि त्यांवर जुलूम व अन्याय होण्याचा प्रश्नच त्यांमध्यें उद्भवत नाहीं.

लहान-सहान शेतकरी व छोटेखानी इतर धंदेवाले ह्यांच्या उद्योगांच्या मार्गांतल्या अडचणी दूर करणें हें समाजाचें म्हणजे सरकारचें कर्तव्य सर्व राष्ट्रांत समजलें जातें. शेतकऱ्यांच्या मदतीचा कायदा मुंबई इलाख्यांत अनेक वर्षें अमलांत आहे व कीं नाहीं ? तेव्हां, सरकारनें सवलती देण्याचें ठरवलें असतां त्या सावकारी व्यक्तींस देणें उचित होईल का अडाणी व गरीब शेतकऱ्यांच्या सहकारी संघांस देणें योग्य होईल ? सरकारनें मदत व सवलत कोणास देणें आवश्यक आहे ? बऱ्या स्थितींत असलेल्या व स्वतःच्या फायद्यासाठी सावकारीचा धंदा करणारांस का परस्पर सहायाच्या तत्त्वावर संघटित झालेल्या दरिद्री व अडाणी शेतकऱ्यांस ? ह्या प्रश्नास निर्विकार मनानें आणि समाजहितदृष्ट्या उत्तर देण्याचा प्रयत्न झाला असतां सावकार आणि सहकार ह्यांच्यामध्यें सहानुभूतिपर वागणुकीच्या बाबतींत सरकार फरक कां करतें ह्याचें कोडें सहज सुटेल. सावकारी धंदा प्रतिष्ठित आणि समाजहितास आवश्यक आहे ह्यांत संशय नाहीं. परंतु सावकारांच्या व्यवहारांचें व व्याजाच्या दरांचें नियंत्रण करणारे कायदे जगांतील सर्व देशांत आहेत. सहकारी संघटनेतर्फे

विशेष तत्त्व लक्षांत न घेतां निव्वळ सावकारीच्या जोर्डास बसवणें अनुचित आहे. सावकारी धंद्यावर सर्वस्वी आवश्यक नाहींत असे निर्बंध घातले जाण्यास विरोध करणें वेगळें आणि सावकार व सहकारी संस्था हे एका माळेंतले मणी आहेत असें प्रतिपादणें वेगळें. सावकारीची तरफदारी करावयाची तर ती मर्यादित आणि सयुक्तिक रीतीनें केली पाहिजे.

---

## परराष्ट्रीय हुंडीचा व्यवहार ( फॉरिन एक्सचेंज )

### (३)

### प्रो. काळे ह्यांचें व्याख्यान

( मागील अंकावरून चालू )

( ८ ) इतर पदार्थांच्या किंमतीप्रमाणें परराष्ट्रीय हुंड्यांची किंमत मागणी-पुरवठ्याच्या परिस्थितीस अनुसरून कमी-ज्यास्त होते. ह्या परिस्थितींत विशेष चलबिचल झाली आणि हुंड्यांची विक्री व खरेदी करून परराष्ट्रीय येणें-देणें भागवण्यापेक्षां सोनें आयात-निर्यात केल्यानें व्यवहार कमी खर्चाचा होतो असें दिसलें तर बँकर्स व व्यापारी अर्थातच ह्या पद्धतीचा अवलंब करतात आणि हुंड्यांच्या ऐवजी सोन्याची आयात-निर्यात होते.

( ९ ) हिंदी चलन पद्धतीच्या इतिहासांत अशीं उदाहरणें घडलीं आहेत. १९०७ सालीं ही गोष्ट घडून आली आणि महायुद्धांत व त्यानंतर तिची पुनरावृत्ति झालेली आहे. दुष्काळामुळें पिकें आलीं नाहींत, असें समजा. ह्याचा परिणाम असा होईल कीं कपास वगैरे शेतीच्या मालाची निर्गत बंद होईल आणि तिच्यामुळें निघणाऱ्या परराष्ट्रीय हुंड्यांचा पुरवठा मर्यादित होईल. आयात व्यापार मात्र त्याच प्रमाणांत कमी होईल असें नसल्यानें त्याबद्दलचें देणें देणारांची सदरहु हुंड्यांविषयींची मागणी कायम राहील. हिंदी रुपये देऊन परराष्ट्रीय चलन घेणारे लोक उत्सुक आहेत, पण परराष्ट्रीय चलन विकून रुपये स्वीकारणारे त्या मानानें बाजारांत कमी आहेत असा ह्याचा अर्थ झाला. परराष्ट्रीय हुंडी ह्या रीतीनें महागल्याकारणानें तिनें "गोल्ड एक्सपोर्ट पॉइंट" म्हणजे सोनें बाहेर पाठवावयाची मर्यादा गांठली, असें समजावें.

( १० ) तथापि, रुपया व सोनें ह्यांचें कायदेशीर प्रमाण ठरलेलें आहे आणि तें अबाधित राखण्याची जबाबदारी सरकारावर आहे. १५ रु.= १ ब्रिटिश सॉव्हरिन हें जुनें प्रमाण प्रचलित होतें तेव्हां १५ रु.+ बँकेचें कमिशन दिलें म्हणजे १ सॉव्हरिन किंमतीची हुंडी मिळत असे. वर वर्णिलेल्या विशिष्ट परिस्थितींत १५⅛ ते १५¼ रुपये देऊन लंडनमध्यें १ सॉव्हरिन घेण्यास लोक तयार होतील. याचाच अर्थ, रुपयाची किंमत कमी झाली, हुंडणावळ उतरली व सोनें महागलें असा झाला. चलनपद्धती व हुंडणावळ ह्यांचें कायदेशीर स्थैर्य अबाधित राखण्याची जबाबदारी पत्करलेल्या सरकारास पूर्वीच्या ठराविक दरानें सोनें किंवा लंडनवरची हुंडी विकावी लागते. चलन पद्धतीचा आधार म्हणून बाळगलेल्या येथील व लंडनमधील सुवर्णनिधींचा उपयोग करून खालीं गेलेली हुंडणावळ सरकार उचलून धरतें आणि कांहीं काळानें अस्थैर्याची परिस्थिति बदलून व मागणी-पुरवठ्याचा मेळ बसून हुंडीचा दर पूर्वस्थलावर येतो. हुंडीचा दर उतरणें व सोनें निर्गत करणें हें देशाच्या घेण्यापेक्षां देणें वाढलें असतां घडतें. त्याच्या उलट परिस्थिति, देण्यापेक्षां येणें अधिक झालें असतां होते. सरकार व मध्यवर्ती बँक ह्यांवर राष्ट्रीय चलन व सोनें ह्यांच्या किंमतींच्या परस्पर-प्रमाणाची स्थिरता राखण्याची जबाबदारी असते.

( ११ ) हुंडणावळीचा दर 'हलका' व 'उंच' आणि 'प्रतिकूल' व 'अनुकूल' आहे असे शब्दप्रचार वापरले जातात तेव्हां सावधगिरी न बाळगल्यास समजुतीचा घोटाळा होण्याचा संभव आहे. पदार्थांची किंमत दर्शवितांना दोन भिन्न शब्दप्रयोग करण्यांत येतात, ते लक्षांत ठेवावे. पूर्वी साखर एका रुपयास ४ शेर होती ती आतां ५ शेर झाली आहे असें म्हटलें काय आणि १ शेर साखरेस ४ आणे पडत होते ते आतां ३¼ आणे पडतात असें म्हटलें काय, दोनहि शब्दप्रचारांचा अर्थ साखर स्वस्त झाली असा आहे. तथापि, पहिल्यांत दराचा आकडा वाढला असून दुसऱ्यांत तो कमी झाला आहे. हीच मोडणी हुंडणावळीच्या दरांच्या मांडणींत आढळते. ह्मणून दर चढला व उतरला हें समजण्यास भावाचें माप कोणतें आहे हें पाहिलें पाहिजे. हिंद-ब्रिटन हुंडणावळ १८ पेन्स आहे, म्हणजे एक रुपयास १८ पेन्स मिळतात. परंतु इंग्लंडमध्यें योजण्यांत येणारी ह्याच दराची मोडणी निराळी आहे. तेथेंहि हा दर १८ पेन्स आहे असें म्हणतात. म्हणजे १८ पेन्सांस १ रुपया मिळतो असा अर्थ होतो. हिंदुस्थानच्या बाजूनें पहावयाचें ह्मणजे १ रुपयास १८ ऐवजीं १९ पेन्स दर झाला असतां हुंडणावळ चढली व 'अनुकूल' झाली असें म्हणतां येईल. इंग्लंडच्या बाजूनें वास्तविक रीतीनें ती उतरली व 'प्रतिकूल' झाली, कारण १ हिंदी रुपया मिळण्यास तेथें १ पेन्स अधिक द्यावा लागला. हिंद-अमेरिकन हुंडणावळ २६० आहे असें म्हणतात. ह्याचा अर्थ १०० अमेरिकन डॉलरांस येथें २६० रुपये पडतात. हा आकडा २६० चा २७० झाला तर १०० डॉलरांस अधिक रुपये द्यावे लागल्यानें अमेरिकन हुंडणावळ हिंदुस्थानास प्रतिकूल झाली. फ्रेंच फ्रँक्सच्या व जपानी येन्सच्या दराची मांडणी अशाच प्रकारची असते.

( १२ ) हुंडणावळीच्या दरांचें कोष्टक प्रसिद्ध होतें त्यांत ही मोडणी प्रथम दर्शविली असते. त्याच्यापुढें कायदेशीर सुवर्ण-प्रमाणाचा दर दिलेला असून विशिष्ट दिवशीं तो कसा कमी-अधिक आहे, हें सांगितलेलें असतें. ह्या कोष्टकाची मांडणी नीट समजावून घ्यावी. कोणत्याहि पदार्थास कमी किंमत पडली असतां तो व्यवहार खरेदी करणाराच्या दृष्टीनें चांगला आणि अधिक पैसे द्यावे लागले असतां तो सवदा वाईट असें आपण समजतों. विनिमयांत विकत घेणाराची व विकणाराची दृष्टि अर्थातच निराळी असते आणि एकास जें इष्ट तेंच दुसऱ्यास अनिष्ट वाटतें. ह्या कारणानें, हुंडया विकत घेण्याचे आणि त्या विकण्याचे बँकांचे दर भिन्न-भिन्न असतात. हुंडणावळीविषयींच्या वृत्तपत्रीय माहितीमध्यें हे निरनिराळे दर दाखवलेले असतात आणि त्यांत बँकांचें कमिशन हिशेबांत घेतलेलें असतें. त्याचप्रमाणें, परराष्ट्रीय हुंडी विकत घेणारा व विकणारा व्यापारी ह्यांचे हितसंबंध भिन्न असल्यानें जो दर एकास अनुकूल तो दुसऱ्यास प्रतिकूल वाटणार, हें उघड आहे.

---

# स्फुट सूचना

## हिंदुस्थान सरकारच्या खर्चांत काटकसर

मध्यवर्ती सरकारच्या राज्यकारभारांत जबाबदार मंत्री नसल्या-कारणानें आणि त्याच्या खर्चावर लोकनियुक्त सभासदांचा ताबा नसल्यानें त्या सरकारच्या खर्चांत काटकसर होण्याविषयींच्या वारंवार सूचना केल्या जातात आणि त्यांचा व्यावहारिक उपयोग कांहीं होत नाहीं. प्रांतिक प्रधान मंडळांनीं आपल्या खर्चास अलीकडे कात्री लावली असून प्रगतीचे विधायक कार्यक्रम हातीं घेतले आहेत. अशा स्थितींत मध्यवर्ती सरकारच्या खर्चाची छाननी होऊन तोहि मर्यादित करण्याचे मार्ग शोधून काढले जावे अशी सूचना त्यास केली जाणें स्वाभाविक आहे. मध्यवर्ती असेंब्लीमध्यें त्या आशयाचा ठराव पुढें मांडण्यांत आला असतां तो सरकारचा विरोध असतांहि मान्य झाला, ह्यांत आश्चर्य नाहीं. युरोपियन सभासदांच्या गटामार्फत त्या ठरावास एक उपसूचना आली होती आणि सर जेम्स ग्रिग ह्यांनीं स्वतःची एक योजनाहि सुचवली होती. मि. जेम्स आणि सर जेम्स ह्या दोघांच्या योजनांचा इत्यर्थ असा होता कीं, लष्करी व मुलकी खर्चांत बचत होण्यास वाव नसल्यानें १० टक्के कपात होण्याची गोष्ट दूरच राहिली, पण नुसती चौकशीची कमिटी नेमण्याचाहि कांहीं उपयोग नाहीं. त्यांच्या मतानें सरकारी खर्चाच्या रकमांचें निरीक्षण करणारी असेंब्लीची एक कमिटी असावी आणि तिनें सरकारच्या ठरलेल्या धोरणाच्या मर्यादेंत सुधारणेबाबत फिनॅन्स खात्यास शिफारसी कराव्या. ब्रिटिश पार्लमेंटांत अशा प्रकारची कमिटी निवडली जाते आणि तिच्या धर्तीवर हिंदुस्थानांतहि योजना अंमलांत यावी असें त्यांचें म्हणणें होतें. ही योजना दिसावयास विधायक आणि प्रगतिकारक अशी होती. परंतु तींत ब्रिटिश पार्लमेंटचें पोकळ अनुकरण होतें आणि तिनें असेंब्लीस सरकारी खर्चावर ताबा मिळण्याचा कांहींच संभव नव्हता. सरकारी खर्चास सध्याच्या आर्थिक परिस्थितीस अनुलक्षून कात्री लाविली जावी हा मूळ ठरावाचा जो उद्देश, तो सफल होण्याची त्या योजनेंत यत्किंचितहि शक्यता नव्हती. ह्या कारणानें असेंब्लीच्या लोकनियुक्त सभासदांचें तिनें कसें समाधान होणार ?

## असेंब्लींत प्राप्तीवरील कराचें बिल

जादा करांचे बाबतींतली हिंदुस्थान सरकारची कायद्याची कोणतीहि योजना विचारांत घेतांना प्रांतिक सरकारांस तिच्यापासून फायदा होणार आहे हा मुद्दा गौण महत्त्वाचा समजला पाहिजे. आपल्या कर-योजनांस प्रांतांचा पाठिंबा मिळवण्यास सर जेम्स ग्रिग ह्यांनीं ह्या युक्तिवादाचा उपयोग करावा हें स्वाभाविक आहे. मध्यवर्ती असेंब्लीपुढें मांडलेलें प्राप्तीवरील कराबाबतचें बिल पास झाल्यास प्रांतिक सरकारांस तात्काळ एक कोटि रुपये जादा उत्पन्न मिळेल आणि क्रमाक्रमानें तें वाढत जाईल असें त्यांनीं सांगितलें. प्रांतिक उत्पन्नांत वाढवा झाल्यास तो केव्हांहि इष्टच आहे. परंतु कराविषयींच्या प्रत्येक कायद्याची कसोटी त्याची न्याय्यान्याय्यता हीच असली पाहिजे. कर-योजनेचे आर्थिक परिणाम समाजावर काय होतील हें नीट पाहून तिची ग्राह्याग्राह्यता ठरवणें योग्य होईल. ह्या दृष्टीनें पहातां, नवीन योजनेचे योगानें कराच्या बोजाची वांटणी सध्या विषम आहे ती सुधारून त्यांतून निसटणाऱ्या श्रीमान लोकांस पुरा हिस्सा द्यावा लागेल आणि त्यांच्यापेक्षां कमी सामर्थ्यवान नागरिकांवरचें ओझें हलकें होईल हा सर जेम्स ग्रिग ह्यांचा मुद्दा चिंतनीय आहे. प्राप्तीवरील कराच्या जाळ्यांतून येनकेन प्रकारेण निसटणारांच्या हिकमती बंद पडतील आणि निरनिराळ्या वर्गांच्या खऱ्या ऐपतीप्रमाणें त्यांचेवर कराचा बोजा पडेल तर तें न्याय्य व इष्टच होईल. सर जेम्स ह्यांच्या म्हणण्याप्रमाणें प्राप्तीवरील कराचा नवीन कायदा पास झाल्यास आज जितके लोक तो कर भरीत आहेत, त्यांपैकीं दोन तृतियांशांचा भार हलका होईल आणि बाकीच्या एक तृतियांशांचा जड होईल. इन्कमटॅक्स इन्क्वायरी कमिटीचा रिपोर्ट जानेवारी, १९३७ मध्यें प्रसिद्ध होऊन त्यावर लोकांची मतें मागवण्यांत आलीं, आणि तीं लक्षांत घेऊन सरकारनें प्रस्तुत बिल तयार केलें. असें असल्यानें तें जनतेच्या माहितीसाठी पुन्हां प्रसिद्ध करण्याचें कारण नसून त्याचा विचार असेंब्लीच्या सिलेक्ट कमिटीवर सोंपवावा अशी सर जेम्स ह्यांनीं सूचना केली. ह्या बाबतींत सरकार व असेंब्ली ह्यांचेमध्यें तडजोड होऊन कमिटी नेमली गेली आहे आणि लोकमत व्यक्त होण्यास संधी दिली जाणार आहे.

## फ्रान्समध्यें आणीबाणीचा प्रसंग

भावी युद्धाच्या भीतीचे दूरगामी परिणाम राष्ट्रांच्या आर्थिक, सांपत्तिक व सामाजिक स्थितीवर किती विलक्षण तऱ्हेचे होत आहेत, ह्याचें नमुनेदार उदाहरण फ्रान्समधल्या सद्यःस्थितीमध्यें सापडतें. हिटलर व मुसोलिनी ह्यांच्या चढाईच्या धोरणामुळें युरोपांतील लहान–मोठ्या राष्ट्रांस चिंता लागली असून काल ऑस्ट्रियांत जर्मनीनें केलेला प्रयोग उद्यां झेकोस्लोव्हेकिया व हंगेरी वगैरे देशांत झाल्यावांचून रहाणार नाहीं असें त्यांस वाटत आहे. कोट्यवधि रुपये खर्चून इंग्लंड स्वतःच्या बचावाची तयारी करीत आहे आणि तडजोडीच्या मार्गानें इटली व जर्मनी ह्यांचें सख्य साधीत आहे. पण लहान-सहान राष्ट्रांनीं रक्षणासाठी कोणाकडे धांव घ्यावी ? त्यांचा वाली कोण ? प्रसंग आला असतां स्वतःचा बचाव कसा करावा ह्याची विवंचना फ्रान्स सारख्या राष्ट्रास लागली असून संरक्षणाच्या तयारीस लागणारा पैसा उभा करण्याची फ्रेंच सरकार शिकस्त करीत आहे. सध्याच्या आणीबाणीच्या प्रसंगीं आपणांस अनियंत्रित सत्ता कायदेमंडळानें द्यावी अशी मागणी त्यानें केली आहे. जादा पैसा उभारण्यासाठी आत्यंतिक उपायांचा अवलंब केल्यावांचून गत्यंतर नाहीं असें त्याचें म्हणणें आहे. चेंबर ऑफ डेप्युटीज्‌मध्यें भाषण करतांना फ्रेंच मुख्य प्रधानांनीं सांपत्तिक परिस्थितीचें चित्र रेखाटलें तें अत्यंत भीषण असें होतें. “सहाशे-सातशे कोटि रुपयांची संपत्ति फ्रेंच नागरिकांनीं भीतीमुळें दडवून ठेवली आहे किंवा परदेशांत पाठवली आहे. आम्हांला बाहेर कर्ज काढतां येत नाहीं आणि जुनीं कर्जें चालू राहूं शकत नाहींत. आम्हांस युद्ध नको, पण फ्रेंच राष्ट्र जगावयास हवें आहे. त्यासाठी पैसा खर्च केला पाहिजे व तग धरली पाहिजे. सरकारचें मामली उत्पन्न अपुरें असल्यानें देशांतल्या देशांत कर्ज काढलें पाहिजे आणि अन्य उपायांनीं पैसा जमवला पाहिजे.” मि. ब्लम ह्यांचे हे उद्गार फ्रान्समधील आणीबाणीच्या परिस्थितीचे निदर्शक आहेत. पण त्यांचा अपेक्षित परिणाम वरच्या कायदेमंडळावर (सेनेट) न होऊन त्यांचेवर राजीनामा देण्याची पाळी आली. सरकारास अनियंत्रित सांपत्तिक सत्ता देण्यास तें मंडळ तयार झालें नाहीं.

## फ्रेंच सरकारची सांपत्तिक योजना

फ्रेंच प्रधानमंडळानें सांपत्तिक व आर्थिक क्षेत्रांत वटहुकुमांच्या जोरावर कारभार करण्याच्या मागितलेल्या अधिकारास विरोध होणें स्वाभाविक आहे. लढाऊ तयारी कार्यक्षम रीतीनें होण्यास अशी अमर्याद सत्ता सरकारास असणें अपरिहार्य आहे असें त्याचें म्हणणें आहे. त्याची सांपत्तिक योजना पाहिली असतां फ्रान्सची आर्थिक स्थिति कोणत्या थरास गेली आहे हें स्पष्ट दिसतें. बँक ऑफ फ्रान्सच्या गंगाजळींत सोनें आहे त्याची किंमत अलीकडे फ्रेंच चलनाची स्वताई झाली आहे, त्या मानानें करावी अशी एक सूचना आहे. त्या बँकेच्या ताळेबंदांत सोन्याची जुनी किंमत घातलेली आहे ( बँक ऑफ इंग्लंडमध्येंहि हीच व्यवस्था आहे ) ती बदलून प्रचलित भावानें तिचा आकडा मोठा करावा, म्हणजे हा वाढावा सरकारास खर्चाकरितां वापरतां येईल असा त्या सूचनेचा अर्थ आहे. ज्यांच्या हातीं ते असतील ते त्यांचे मालक, अशा स्वरूपाचे ( बेअरर ) सरकारी कर्ज रोखे आहेत, त्यांचें रूपांतर विशिष्ट इसमांच्या मालकीचें नांव धारण करणाऱ्या रोख्यांत करावें, म्हणजे सरकारास सावकारांवर नजर ठेवणें सोयीचें होईल असेंहि सुचवण्यांत आलें आहे. फ्रान्समधील सर्व लोकांच्या ( परराष्ट्रीय देखील ) संचित संपत्तीचा अश ठरलेल्या कोष्टकास अनुसरून सरकार घेईल. दीड लक्ष फ्रँक्सपासून आठ कोटि फ्रँक्सपर्यंतच्या संपत्तीचा ४ टक्क्यांपासून १७ टक्क्यांपर्यंत चढत्या प्रमाणांत भाग वसूल केला जाईल. ही वसुली दहा वर्षांच्या मुदतींत क्रमाक्रमानें होईल आणि तिचें उत्पन्न दरवर्षी सुमारें १५ कोटि रुपये येईल असा अंदाज आहे. प्राप्तीवरील कराचे दर चढवण्यांत येतील आणि त्यांची आकारणी अधिक कडक रीतीनें होईल. सरकारी रोखे धारण करणारांस देण्यांत येणाऱ्या कांहीं सवलती काढून घेतल्या जातील आणि परतफेडीची योग्य वेळ आली असली तरी दोन वर्षेंपर्यंत सरकारी कर्जाचे पैसे दिले जाणार नाहींत. ह्या सर्व उपायांच्या योगानें फ्रेंच सरकारचें वार्षिक उत्पन्न सुमारें ८० कोटि रुपयांनीं वाढेल असा अंदाज आहे. असल्या उलथापालथ करणाऱ्या योजनेस फ्रेंच सेनेटमध्यें विरोध होऊन फ्रेंच मंडळास अधिकारत्याग करावा लागला, ह्यांत काय आश्चर्य आहे ?

## कापडाच्या गिरण्यांतील कामगारांचें वेतन

### " मँचेस्टर गार्डियन " पत्राचा अभिप्राय

मुंबई प्रांतामधील कपास कापडाच्या गिरण्यांतील कामगारांस सध्यापेक्षां ज्यास्त दरानें वेतन मिळावें, असें त्याबाबत नेमलेल्या चोकशी कमिटीनें सुचवून मासिक वेतनांत किती वाढ व्हावी, हेंहि दर्शविलें होतें. त्याप्रमाणें मुंबई व अहमदाबाद येथील गिरणी कामगारांस अनुक्रमें ११ व ९ टक्के ज्यास्त मजुरी मिळण्यास प्रारंभ झाला आहे. ह्यासंबंधीं लिहितांना ' मँचेस्टर गार्डियन ' हें ब्रिटिश पत्र म्हणतें:–


" कमिटीच्या कामाविषयीं अनेक तक्रारी करण्यांत आल्या आहेत. कमिटीनें तात्कालिक कारणांस—उदाहरणार्थ कपाशीच्या बाजारभावांतील उतारास व चीन-जपान युद्धास—असमर्थनीय असें महत्त्व दिलें, अशी एक तक्रार आहे. ह्या दोन गोष्टींचा गिरण्यांचे सांपात्तिक स्थितीवर फार मोठा अनुकूल परिणाम झालेला असून, तो पुढें नाहींसा झाल्यावर सरकार पुनः कामगारांचें वेतन कमी करूं शकेल, असा युक्तिवाद करतां येण्याजोगा आहे. मजुरी व नफा ह्यांचा पुरा मेळ घालण्याची योजना नवीनच प्रकारची आहे. तथापि उत्पादकांस मोठ्या प्रमाणावर जकातींचें संरक्षण मिळत असलेल्या देशांत अशी व्यवस्था करणें सरकारास आवश्यक वाटणें अस्वाभाविक नाहीं."


गव्हाचे पोहे
( REGD. ) ( BLOSSOM ) ( REGD. )

कित्येकांना गहू खाण्याची इच्छा असते. पण प्रकृतीमुळें अगर हवामानामुळें सोसत नाहीं. अशा लोकांना हे गव्हाचे पोहे चांगले मानवतात. विशेषतः लहान मुलांना सकाळचें किंवा मधल्या वेळेचें खाणें म्हणून ह्यांचा उपयोग हितकारी ठरतो.

ह्या पोह्यांचा तिखट व गोड चिवडा होतो. तसेंच हे दह्या-दुधांतून खातां येतात.

७५३ सदाशिव ) पुणें २. ) भास्कर पांडुरंग सहस्रबुद्धे कारखानदार.



टिळक आयर्न अँड स्टील वर्क्स
[ सर्व प्रकारचें स्टील स्ट्रक्चरल वर्क ( काम ) तयार करतात. ]
मो. मु. टिळक
प्रो. मेकॅनिकल इंजीनिअर.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय
झारापकर टेलरिंग कॉलेज
आप्पा बळवंत चौक, पुणें २
[ माहितीपत्रक मागवा ]

The Home for
Reliable STENO-TYPIST & ACCOUNTANTS
MARATHI KENDRA : 292 Sadashiv Peth POONA

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

बँकेच्या उतरत्या व्याजाचे काळांत
डॉन ऑफ इंडियाच्या ६% मासिक आवक ठेव योजनेचा फायदा ता. ३१-३-३८ पर्यंत देण्यांत येईल. माहिती करितां लिहा.
जनरल म्यानेजर–डॉन ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

## वाढत्या हिंदी लोकसंख्येचें पोषण कसें होणार ?

### शेतीचें उत्पन्न वाढविण्याची आवश्यकता

हिंदुस्थानच्या लोकसंख्येंत झपाट्यानें भर पडत चालली असून त्या मानानें उद्योगधंद्यांची वाढ होत नाहीं व शेतीच्या क्षेत्रफळांत अगर उत्पन्नांतहि सुधारणा होत असलेली आढळत नाहीं, ही परिस्थिति अत्यंत चिंताजनक आहे. १८९० सालीं लोकसंख्या १०० होती व शेतीचें क्षेत्रफळहि १०० होतें असें धरल्यास गेल्या ४० वर्षांत त्या दोहोंत कशी वाढ झाली हें खालील तुलनात्मक आकड्यांवरून स्पष्ट होईल:—

| दशवार्षिक मुदत | लोकसंख्या | शेतीचें एकूण क्षेत्रफळ | खाद्य पिकां-खालील जमीन |
|---|---|---|---|
| १८९१–१९०१ | १०० | १०० | १०० |
| १९०१–१९११ | १०६ | १११ | १०८ |
| १९११–१९२१ | १०७ | ११५ | ११२ |
| १९२१–१९३१ | ११८ | ११८ | ११४ |

म्हणजे, जरी पिकांखालील जमिनीचें क्षेत्र वाढलें असलें, तरी दरमाणशीं पडणारें क्षेत्रफळाचें प्रमाण कमीच झालें आहे. ह्याचें कारण लोकसंख्येची वाढ जास्त झपाट्यानें होत गेली, हें होय. हें प्रमाण खालील आकडे दर्शवितात:—

| वर्ष | दर माणशीं शेतीचें क्षेत्र (एकर) | दर शेतकऱ्याचे वांट्यास येणारी जमीन (एकर) |
|---|---|---|
| १८९१ | ०·८८ | १·४४ |
| १९०१ | ०·८३ | १·१७ |

प्रत्येक मनुष्यास दरसाल लागणारें धान्य पिकण्यास एक एकर जमीन लागते. तेव्हां जास्त जमीन पिकाखालीं आणणें किंवा जमीनीची उत्पादक शक्ति वाढवणें ह्या उपायांचा अवलंब केल्यावांचून भागणार नाहीं. तथापि, ह्यापुढें विशेष अधिक जमिनींत पिकें लावतां येणें संभवनीय दिसत नाहीं. पिकांचें क्षेत्र कसें वाढत आलें आहे हें खालील आकड्यांवरून दिसेल:—

| वर्ष | पिकांखालील जमीन (एकर) कोटि | लक्ष |
|---|---|---|
| १८९१ | १९ | ४ |
| १९०१ | १९ | ७ |
| १९११ | २१ | ६ |
| १९२१ | २२ | २ |
| १९२६ | २२ | ५ |
| १९३१ | २२ | ५ |
| १९३४-३५ | २२ | ७ |

१९२६ नंतर वाढ खुंटलेली दिसते. जरी आणखी थोड्या क्षेत्रांत पिकें लावतां आलीं, तरी दर एकरी उत्पन्न वाढविल्या-खेरीज परिस्थिति सुधारणार नाहीं. गहूं व ऊंस ह्या पिकांचें उत्पादन वाढवून इंपीरियल ॲग्रिकल्चरल रिसर्च इन्स्टिट्यूटनें प्रगतीची दिशा दाखविली आहे. सुधारलेल्या जातींचीं पिकें काढून व खतांचें सहाय घेऊन उत्पन्नांत वाढ करतां येते. तांदळाचें दर एकरी उत्पन्न उतरत चाललें आहे, ह्याचें कारण त्या पिकास खत दिलें जात नाहीं, हें होय. जमिनीचा कस सुधारून तो कायम राखला पाहिजे. तरच तिची उत्पादक शक्ति टिकूं शकेल.

---

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् कोऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—अपोलो रस्ता, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती (जि. पुणें) | १६ अकलूज (जि. सोलापूर) |
| २ सातारा („ सातारा) | १७ विरमगांव („ अहमदाबाद) |
| ३ इस्लामपूर („ „) | १८ धुळें („ प. खानदेश) |
| ४ कऱ्हाड („ „) | १९ दोंडाईचें („ „) |
| ५ तासगांव („ „) | २० शिरपूर („ „) |
| ६ किर्लोस्करवाडी („ „) | २१ शहादें („ „) |
| ७ शिराळें („ „) | २२ नंदुरबार („ „) |
| ८ कोरेगांव („ „) | २३ साक्री („ „) |
| ९ भिवंडी („ „) | २४ शिंदखेडें („ „) |
| १० अहमदनगर („ अहमदनगर) | २५ तळोदें („ „) |
| ११ शेवगांव („ „) | २६ मालेगांव („ नाशिक) |
| १२ कोपरगांव („ „) | २७ सटाणा („ „) |
| १३ वाई („ ठाणें) | २८ कळवण („ „) |
| १४ पालघर („ „) | २९ दोहद („ पंचमहाल) |
| १५ कल्याण („ „) | ३० कालोल |

खेळतें भांडवल रु. २०००००००चेवर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

फक्त नोंदलेल्या सहकारी पतपेढ्यांनाच कर्जें दिलीं जातात.

शिवाय

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेड ऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## प्राप्तीवरील कराची गळती थांबविण्याचा प्रयत्न

### नव्या बिलाचा मसुदा

हिंदुस्थानांतील प्राप्तीवरील कराच्या आकारणीच्या पद्धती-संबंधीं चौकशी करून सूचना करण्यासाठीं ऑक्टोबर, १९३५ मध्यें दोन ब्रिटिश तज्ञांची नेमणूक करण्यांत आली होती. त्यांचा रिपोर्ट जानेवारी, १९३७ मध्यें प्रसिद्ध झाला. सदरहु रिपोर्टांतील सूचनांस अनुसरून मध्यवर्ती सरकारनें एक बिल तयार केलें, तें लेजिस्लेटिव्ह असेंब्लीस गेल्या आठवड्यांत सादर करण्यांत आलें. ह्या बिलामध्यें एकूण ७५ कलमें आहेत.

प्राप्तीवरील कराच्या आकारणीबाबतच्या नवीन योजनेमुळें हिंदी नागरिकांस हिंदुस्थानाबाहेर झालेल्या परंतु हिंदुस्थानांत न आणलेल्या प्राप्तीवरहि कर भरावा लागेल. पत्नीचें उत्पन्न तें पतीचें उत्पन्न मानण्यांत येईल; मात्र पत्नीनें स्वकष्टानें मिळविलेल्या ५०० रुपयांस कराची माफी मिळेल. सध्या हिंदुस्थानांत सुपरटॅक्सचे बाबतींत अंमलांत असलेली करपद्धति प्राप्तीवरील करासहि लागू होईल. प्राप्तीचे टप्पे किंवा पायऱ्या कल्पिल्या जातील. प्रत्येक टप्प्यांतील उत्पन्नावर विशिष्ट दरानें आकारणी होईल व प्रत्येक टप्प्यांतील उत्पन्नावरील कराची बेरीज करून एकूण करभार ठरविण्यांत येईल. रेल्वेचें भाडें ह्याच पद्धतीनें आकारतात. पहिल्या ५० मैलांस दर मैली अमूक दर, नंतरच्या ५० मैलांस त्याहून कमी विशिष्ट दर, अशा रीतीनें भाडें ठरवितात. ह्यापुढें प्राप्तीवरील कराची आकारणी ह्याच तऱ्हेनें केली जाईल; फक्त कराचा दर प्रत्येक टप्प्यागणिक वाढेल, एवढेंच. प्राप्तीवरील कर भरण्यास पात्र असलेल्या प्रत्येक नागरिकानें आपण होऊन आपल्या मिळकतीचा तपशील सादर केला पाहिजे, अशी बिलांत योजना आहे. कराच्या आकारणीमधील गळती थांबावी, ह्याकरितांहि बिलानें तरतूद केली आहे व कर चुकविणारांस कडक शासन करण्याचा इन्कमटॅक्स खात्यास अधिकार दिला आहे. कराच्या आकारणींतील वांध्यांचा निकाल असिस्टंट कमिशनर व त्यावरील अपील ऐकण्यासाठीं एक ट्रायब्यूनल, त्याचप्रमाणें एक चीफ कमिशनर, इत्यादि नव्या नेमणुका प्रस्तुत बिलाच्या योजनेंत अंतर्भूत आहेत.

## प्रधानांचा प्रवास-खर्च

१ एप्रिल ते १८ जुलै, १९३७ ह्या मुदतींतल्या तात्पुरत्या मुंबई प्रधान मंडळांतील श्री. जमनादास मेहता ह्यांस प्रवास-भत्ता म्हणून ३,८४४ रुपये देण्यांत आले. सर धनजीशहा कूपर ह्यांचा प्रवास खर्च १,६६३ रुपये झाला व सर सिद्दप्पा कंबळी ह्यांच्या प्रवासास ३,१७५ रुपये लागले.

१९ जुलै, १९३७ रोजीं काँग्रेसनें मंत्रिपद स्वीकारलें, तेव्हांपासून २८ फेब्रुवारी, १९३८ पर्यंत प्रधानांचा प्रवास-खर्च खालीलप्रमाणें झाला:—मुख्य प्रधान, श्री. खेर : ९१५ रुपये; फडनवीस, श्री. लठ्ठे : ३९८ रुपये; गृहमंत्रि, श्री. मुनशी : १४२९ रुपये; आरोग्यमंत्रि, डॉ. गिल्डर : ११० रुपये; महसूलमंत्रि, श्री. मुरारजी : ७२२ रुपये; पाठबंधारे खात्याचे मंत्रि, श्री. नुरी : २१२३ रुपये व स्थानिक स्वराज्यमंत्रि, श्री. पाटील : ८२५ रुपये.

---

## प्रांतिक सरकारांचें अबकारी उत्पन्न

हिंदुस्थानांतील काँग्रेस-प्रांतांनीं दारुबंदीचें धोरण स्वीकारलें असून, त्याबाबत प्रयत्नास प्रारंभ केला आहे. सबंध हिंदुस्थानांत मिळून अबकारी उत्पन्न २० ते २१ कोटि रुपये होतें, तथापि प्रत्येक प्रांतांतील एकूण उत्पन्नाशीं प्रांतिक अबकारी उत्पन्नाचें पडणारें प्रमाण सारखें नाहीं. वेगवेगळ्या प्रांतांत हें प्रमाण कसें आढळतें, ह्याची कल्पना खालील कोष्टकावरून येईल:—

| प्रांत | अबकारी उत्पन्नाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण % |
|---|---|
| मद्रास | ३९ |
| बिहार व ओरिसा | ३४ |
| मुंबई | २८ |
| आसाम | २८ |
| मध्यप्रांत | २५ |
| बंगाल | २० |
| संयुक्त प्रांत | १२ |
| पंजाब | ११ |

---

३० एप्रिल १९३८ अखेर होणाऱ्या
तृतीय त्रैवार्षिक मूल्यमापनापूर्वी आपला विमा उतरवून
नवीन बोनसमध्यें भागीदार व्हा.
२० व्या शतकांत विमा उतरणें ही अत्यंत आवश्यक व महत्त्वाची गोष्ट आहे.
एकदां विमा उतरण्याचें ठरल्यावर तो "कॉमनवेल्थ" सारख्या
राष्ट्रीय व प्रगतिप्रिय संस्थेंत उतरणें श्रेयस्कर आहे.
अधिक माहितीकरितां लिहा :
दि कॉमनवेल्थ अॅशुअरन्स कं. लि०
पुणें २.
शाखा: मुंबई, मद्रास, अहमदाबाद, कलकत्ता, दिल्ली.

"अर्थ" ग्रन्थमाला
व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं पुस्तकें.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
वरील प्रत्येक पुस्तक लोकप्रिय झालें आहे.
किं. १ रु. (ट. ख. निराळा)
व्यवस्थापक, 'अर्थ' ग्रन्थमाला,
पुणें ४.

### शहरांची वाढ–लंडनचें उदाहरण

ग्रेटब्रिटनचा व्यापार, उद्योगधंदे, रेल्वेज व आगबोटी ह्यांचें लंडन शहर हें केंद्रस्थान आहे. त्या बृहन्नगराची लोकसंख्या ८० लक्ष आहे आणि त्याच्या चतुःसीमेच्या कक्षेंत असलेल्या कारखान्यांची संख्या १९२१ सालीं २५ हजार होती ती १९३६ मध्यें २९ हजारांचे वर गेली आहे. हिंदुस्थानांत मुंबई, कलकत्ता, मद्रास, कानपूर, अहमदाबाद इत्यादि शहरांत लहान प्रमाणांत पण ह्याच प्रकारची वाढ होत चाललेली दिसून येते. लंडन शहराच्या बाहेर आसपास नवीन वस्ती व नवीन कारखान्यांची स्थापना झपाट्यानें चालली आहे. मुंबईच्या उपनगरामधून दररोज सकाळ-संध्याकाळ हजारो लोक निरनिराळ्या प्रकारांच्या वहानांतून व मार्गांनीं जातां-येतां पहाणारांस लंडन शहरांतल्या प्रचंड वहातुकीची कल्पना येईल. लंडन ट्रान्सपोर्ट बोर्डाच्या व्यवस्थेखालीं असलेल्या वहातुकीच्या साधनांनीं दर वर्षीं ४०० कोटि माणसें प्रवास करतात आणि त्यांपैकीं २५ कोटि कामकऱ्यांस सवलतीचे दर आहेत ते देऊन लंडनमध्यें ये-जा करतात. वाढत्या लोकसंख्येच्या सोयीसाठीं नवीं घरें बांधण्यांत येत असलीं तरी तीं अपुरीं होत आहेत. एका कुटुंबाच्या रहाणीसाठीं बांधलेल्या घराच्या लहान भागांत रहाण्याचा प्रसंग लंडनमधील एकूण संख्येच्या दोन-तृतियांश इतक्या कुटुंबांवर आला आहे. हवा व करमणुकीची सोय ह्या दृष्टीनें विचार करतां लंडन शहरास ६० चौरस मैल एवढ्या क्षेत्राचीं खेळाचीं मैदानें व १४० चौरस मैल जादा मोकळी जागा आवश्यक आहे. शहरांची वाढ होणें हें प्रगतीचें लक्षण आहे खरें; तथापि, लाखो शहरवासीयांच्या आरोग्याची जबाबदारी त्याबरोबरच वाढून अनेक बिकट प्रश्न स्थानिक स्वराज्य संस्थांचे पुढें येऊन उभे रहातात आणि ते सोडवण्यास ह्या संस्था व प्रांतिक आणि राष्ट्रीय सरकार ह्यांचें सहकार्य आवश्यक होतें. व्यवस्थित व चांगल्या नगररचनेच्या योजनांचें महत्व ह्यावरून सहजच सिद्ध होतें.

---

### सिनेमा नट-नटींच्या चहात्यांचा पत्रव्यवहार

चित्रपटांत काम करणाऱ्या नटनटींच्या अभिनयावर व सौंदर्यावर खुष होऊन त्यांस स्तुतिपर पत्रें पाठवणाऱ्या च्हात्यांची संख्या पाश्चात्य देशांमध्यें एवढी मोठी आहे कीं ह्या उद्योगाची हिंदी लोकांस कल्पनाहि येणार नाहीं. प्रसिद्ध नट-नटींचा त्यांस येणाऱ्या पत्रांस उत्तरें पाठवण्याचा एक धंदाच होऊन बसतो आणि तो व्यवस्थित रीतीनें पार पडावा म्हणून त्यांस लघुलेखक, टायपिस्ट्स, कारकून ह्यांचें सहाय घ्यावें लागतें. त्यांस येणाऱ्या पत्रांची संख्या हें नटांच्या लोकप्रियतेचें गमक समजलें जातें. चित्रपटांच्या फायद्याचे दृष्टीनें हा पत्रव्यवहार त्यांच्या मालकांस इष्ट असतो, तसाच तो नट-नटींसहि प्रसिद्धीच्या व मिळकतीच्या दृष्टीनें प्रिय असतो. एक लेखक म्हणतो कीं बिंग क्रॉस्बी ह्या नटानें गेल्या वर्षीं सही केलेले स्वतःचे दोन लक्ष फोटोग्राफ आपल्या चहात्यांस त्यांच्या स्तुतिपत्रांच्या उत्तरादाखल पाठवले. जिंजर राजर्स ह्या नटीस प्रतिवर्षीं तीन हजारांच्यावर विवाहाच्या मागण्या येतात, असेंहि तो सांगतो. ह्या पत्रव्यवहारामुळें पोस्ट ऑफिसास काम व उत्पन्न मिळतें, ह्याचा उल्लेख करण्याचें कारण नाहीं.

---

### रांची येथील वेड्यांचें इस्पितळ

हिंदुस्थानांतील सर्वांत मोठें वेड्यांचें इस्पितळ रांची येथें आहे. त्या इस्पितळांत १९३६ सालीं सुमारें १½ हजार बुद्धिभ्रष्ट होते.


" देशांतील चळवळींची, परदेशांतील घडामोडींची, प्रांतिक कायदेमंडळांतील कामकाजाची, शेतकरी आणि कामगार यांच्या चळवळींची समग्र माहिती देणारें सर्वांचें आवडतें मासिक

**नवप्रभा**

पृष्ठें ४८. आकार सह्याद्रि मासिकाचा. वार्षिक वर्गणी ट. हं. सह सव्वा रुपया

**आजच पाठवून वर्गणीदार व्हा.**

नमुना अंकाकरितां सव्वा दोन आण्याचीं पोस्टाचीं तिकिटें पाठवा.

**पाहिजेत** नवप्रभेकरितां वर्गणीदार मिळवून देण्याकरितां ठिकठिकाणीं दरमहा ३० रुपये पगारावर एजंट्स नेमणें आहेत. गरजूंनीं सविस्तर माहितीसह अर्ज करावेत. उत्तराकरितां पोस्टाचें एक आण्याचें तिकिट पाठवा.

मॅनेजर ' **नवप्रभा** ' बेळगांव.

**रक्तपात व राज्यक्रांति**

**यांचें मनोवेधक वास्तवचित्र**

**हंस चित्र**

: लेखक : खांडेकर

: छाया लेखक : पांडुरंग नाइक

: दिग्दर्शक : विनायक

: हिंदीकार : इंद्र

: चित्रकथा-संकलक : जुन्नरकर

: संगीतकार : घमणखां

: ध्वनिमुद्रक : चिं. मोडक

: कलानियोजक : पट्टनिटकर

: प्रकाशक : SUPREME FILM DISTRIBUTORS, BOMBAY 4.

: भूमिका : चंद्रमोहन, रत्नप्रभा, आशालता, रजनी, मांडरे, ढवळे, बुलबुले, जावडेकर, विनायक

ज्वालामधील गाणीं हि. मा. व्हॉ. रेकॉर्डसवर ऐका.

**ज्वाला**

व्ही. व्ही. ॲन्ड को०

जंपर स्पेशालिस्ट

**लेडीज ॲन्ड जेन्टस टेलर्स,**

४८ निहाल पेठ ( मुदलीयार रोड ), पुणें शहर.

## भिमथडी व इंदापूर ता. को. सु. यूनिअन लि.

इंदापूर भागांतील या यूनियनला व इंदापूर येथील पूना सें. को. बँकेस सामील असलेल्या जिराईत भागांतील सोसायट्यांकरितां व्याजाच्या सवलतीच्या योजनांविषयीं चर्चा करण्यासाठीं अशा सोसायट्यांच्या चालक ( सेक्रेटरी, चेअरमन आणि पंच ) मंडळींची सभा इंदापूर येथें ता. २८–३–३८ रोजीं सब. ऑडिटर श्री. जी. एन. पंडित ह्यांच्या अध्यक्षतेखालीं यूनिअनच्या कचेरींत भरली होती.

प्रारंभीं या तालुक्याचे सुपरवायझर श्री. डी. एम. शिणगारे यांनीं सभेचा उद्देश सांगून आलेल्या मंडळींचें स्वागत केलें.

अध्यक्षांनीं, सदर सभा ही चर्चात्मक स्वरूपाची असावी व सवलतीच्या सरक्युलरसंबंधीं खुल्या दिलानें सर्वांनीं भाग घ्यावा व आपल्या अडचणींसंबंधीं विचारविनिमय करावा असें सांगितल्यावर पुढील कामास सुरवात झाली.

सुपरवायझर मि. शिणगारे यांनीं सवलतींबाबत रजिस्ट्रारसाहेबांचीं सर्क्युलरें वाचून दाखविलीं व त्यांचीं सोप्या भाषेंत फोड करून सांगितली. चर्चेत श्री. शिणगारे, इंगळे, व मोकाशी यांनीं आणि सोसायट्यांच्या कांहीं चालकांनीं भाग घेतला. सवलतीबाबतच्या दोन योजनांपैकीं कॅनाल भागांतील सोसायट्यांच्या सवलतींबाबत नं. ३/५ चे सरक्युलरप्रमाणें योजना या भागांत चालू करण्याबद्दल यूनियनकडून लिहून आलें आहे त्याप्रमाणें सवलतीची योजना चालू करावी, असें सर्वानुमतें ठरलें. सदर सरक्युलरमध्यें नमूद असलेल्या परिस्थितिव्यतिरिक्त विशेष परिस्थिति असल्यास तशा सोसायटीचे बाबतींत असिस्टंट रजिस्ट्रार यांची मंजूरी घेण्यांत यावी असेंहि ठरलें. कॅनाल भागांतील योजना मान्य करण्यांत आल्यामुळें सोसायट्यांस असलेल्या बँककर्जावरील व्याजाचा दर शक्य तितका कमी करण्याबद्दल पुणें सें. को. बँकेस विनंती करण्यांत यावी असाहि ठराव पास झाला. तुंबलेल्या थकबाकीप्रमाणें इतर थकबाकीसहि सदर सवलतीचा फायदा मिळावा याकरितां मंजुरी मागावी असें सर्वानुमतें ठरलें.

### मुंबई प्रांतांतील जनन–मृत्यूचे आकडे

१९३१ च्या शिरगणतीप्रमाणें मुंबई प्रांताची लोकसंख्या १ कोटि, ८० लक्ष आहे. १९३६ सालीं त्यांत एकूण ७ लक्ष, ४२ हजार जन्म नोंदले गेले व ४ लक्ष, ९७ हजार मृत्यू घडले. जननाचें दर हजारीं प्रमाण ४१·४० व मृत्यूचें दर हजारीं प्रमाण २७·७३ इतकें पडलें. कॉलऱ्यानें ११ हजार लोक मेले, देवीच्या साथींत ४,३२० लोक मृत्युमुखीं पडले व प्लेगनें ५७८ जणांचा बळी घेतला. १८९६ सालीं ह्या प्रांतांत प्लेगचा प्रादुर्भाव झाला, तेव्हांपासून आतांपर्यंत कोणत्याहि एका वर्षाचे अवधींत प्लेगनें इतके कमी लोक मरण पावले नव्हते. मलेरियानें २७½ हजार लोक मेले.

मुंबई प्रांतांत युरोपियनांची संख्या १८,०२८ आहे, तिचेमध्यें जननानें २५४ ची भर पडली व मृत्यूमुळें १३२ नें ती संख्या कमी झाली. ॲंग्लोइंडियन वस्ती १४,१७६ आहे. त्यांचेमधील १९३६ सालांतील जनन व मरण ह्यांचे आकडे अनुक्रमें २३० व १४३ असे होते.

मुंबई शहरांत नोंदण्यांत आलेल्या ३८,३३३ जननांपैकीं २७,१८७ अर्भकांचा जन्म प्रसूतिगृहांत झाला.

घरच्या घरीं संगीत कलेंत प्राविण्य मिळविण्यास
सर्वोत्कृष्ट-सचित्र-सुबोध-माहितीपूर्ण

# संगीत–मार्गदर्शक

मालेचीं पुस्तकें.

| गायन | हार्मोनियम | दिलरुबा | फिडल् |
|---|---|---|---|
| किं. ६ आ. | किं. २॥ रु. | किं. १ रु. २ आ. | किं. १ रु. ४ आ. |

व्ही. पी. नें चार आणे जास्त पडतील.

प्रभा संगीत विद्यालय, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणें ४.

## —कार्यक्रम—

( १ ) वर्षप्रतिपदेला ( चैत्र शुद्ध १ ) मशिनरीच्या उभारणीला प्रारंभ.

( २ ) १९३९ च्या जानेवारींत साखर करण्यास प्रारंभ.

**दरवर्षी ५॥ टक्के व्याज**

व

दोन वर्षांनीं डिपॉझिटची रक्कम परत.

सविस्तर माहिती खालील पत्त्यावर मिळेलः—

**दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड.**

२५७ बुधवार पेठ, बेलबागेसमोर,
भिडेवाडा, पुणें २.

## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष आणि गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध **आर्डोमिक्स** ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे पाठावरून तयार केलेलें असून ५० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटीपोटांत कळा मारणें, अकालीं गर्भपात, ज्वर, कडकी, डोकें दुखणें, शौचास साफ न होणें इत्यादि विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या **आर्डोमिक्स**मध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत. गुणांमध्यें याची बरोबरी बाजारांतील इतर औषधें करूं शकत नाहींत. किंमत, बाटलीस रु. ३. ट. ख. १२ आणे निराळा. एकदम तीन बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह ९ रु.

हिंदुस्थान, ब्रह्मदेश, व सिलोनसाठीं मुख्य विक्रेतेः—

**धी इंडो फॉरिन एजन्सीज. ( डिपार्टमेंट नं. ६ )**

२५५/७ पेंडसे चाळ, सदाशिव पेठ, पुणें शहर.

## झारापकर टेलरिंग कॉलेज, दादर

### उद्घाटन समारंभ

पुणें येथील सुप्रसिद्ध झारापकर टेलरिंग कॉलेजनें ता. १ एप्रील, १९३८ रोजीं दादर येथील प्लाझा सिनेमासमोरील आपल्या जागेंत बॅ. जमनादास मेहता यांच्या अध्यक्षतेखालीं आपली नवीन शाखा उघडण्याचा समारंभ साजरा केला. या समारंभास श्रीमंत मोतीरामशेट टोपीवाले, बेल कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्रीमंत रामभाऊ पाटकर, रावबहादुर वासुदेवराव अनंत बांबर्डेकर, श्री. एस. एस. नाईक इंजिनियर, श्री. वासुदेवराव सामंत सॉलिसिटर, डॉ. सावरकर, मुंबई म्युनिसिपालिटीचे डे. असेसर, श्री. डी. एस. सामंत, श्री. बी. ए. पाटील, बलवंत पत्राचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री. पटवर्धन, शिवाजी पब्लिक स्कूलचे प्रिन्सिपॉल, श्री. आर. व्ही. नाडकर्णी, एम. ए., व्ही. जे. टेक्निकल इन्स्टिट्यूटचे टीचिंग इन्स्पेक्टर श्री. जी. आर. सामंत, श्री. एम. एस. झारापकर एम. ए. इत्यादि साडेतीनशे ते चारशे मंडळी हजर होती.

सुरवातीला झारापकर आर्ट स्टूडिओमार्फत जमलेल्या मंडळींचा फोटो घेण्यांत आला. अध्यक्षांची निवड व ईशस्तवन झाल्यावर श्री. एम. एस. झारापकर, एम. ए. यांनीं निरनिराळ्या ठिकाणांहून आलेले संदेश वाचून दाखविले. आलेल्या संदेशांत श्रीमंत राणीसाहेब, संस्थान सावंतवाडी, श्रीमंत राजेसाहेब, संस्थान औंध, श्रीमंत राजेसाहेब, संस्थान इचलकरंजी, श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित, प्रो. व्ही. जी. काळे, संपादक अर्थ, स्वातंत्र्यवीर बॅ. तात्याराव सावरकर, श्री. एल. बी. भोपटकर, श्री. आ. रा. भट, श्री. ग. वि. केतकर, प्रि. धनंजयराव गाडगीळ, प्रो. ओतूरकर, प्रो. व्ही. जी. देशपांडे, प्रि. के. एम. खाडये, प्रि. व्ही. जी. जगताप, डॉ. बी. आर. गुणे, श्री. शंकरराव करपे, महाराष्ट्रीय मंडळ, मराठी केंद्र, जाधव टेलरिंग कॉलेज, पराडकर्स कटिंग ॲकेडमी इत्यादींचे अनेक संदेश आले होते. संदेशवाचनानंतर संस्थेचे जनरल मॅनेजर श्री. टी. व्ही. कदम, डी. एम. टी. सी. ए. (लंडन) यांनीं अध्यक्षांची ओळख करून दिली व संस्थेचा पांच वर्षांत झालेल्या प्रगतीचा अहवाल सांगितला. संस्थेनें पांच वर्षांच्या अल्पावधींत शिवणकलेच्या क्षेत्रांत अखिल हिंदुस्थानभर नांवलौकिक संपादन केला आहे व तरुणांमध्यें माजलेली भयंकर बेकारी अल्पांशानें तरी नष्ट करण्याचा यत्न केला आहे. संस्था करीत असलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल श्री. एस. एस. नाईक, श्री. सामंत, सॉलिसिटर, श्री. परचुरे, श्री. पाटील, श्री. प्रभु, डॉ. सावरकर इत्यादि वक्त्यांनीं संस्थेच्या अभिनंदनपर भाषणें केलीं. त्यानंतर अध्यक्ष बॅ. जमनादास मेहता यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत संस्थेमधील उत्कृष्ट शिक्षणपद्धतीबद्दल आपण अनेकवार संस्थेंत जाऊन खात्री करून घेतल्याचें सांगितलें व अशा उपयुक्त संस्थेचा फायदा हिंदुस्थानांतील तरुणांनीं घ्यावा असें सांगून या संस्थेची उत्तरोत्तर भरभराट होवो असें इच्छून संस्था सुरू झाल्याचें जाहीर केलें.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट (२८ नोव्हेंबर, १९३५ पासून) | ३% |
| **सरकारी कर्जरोखे** | |
| ५% करमाफ लोन (१९४५-५५) ... ... | ११८—६ |
| ५% (१९३९-४४) लोन ... ... ... | १०३-१४ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—४ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८—११ |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०६—३ |
| ३¾% १९४८-५२ ... ... ... | १००—८ |
| **निमसरकारी रोखे** | |
| ४% पोर्ट ट्रस्ट (बिगर गॅरंटी व लांब मुदत) ... | ११०—४ |
| ४% मुंबई म्युनिसिपल (लांब मुदत) ... ... | १०९—८ |
| ६% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बॉंड (७० वर्षे मुदत) | १०९—८ |
| ४% म्हैसूर कर्ज (१९५३-६३) ... .. | ११२—० |
| ५% म्हैसूर कर्ज (१९५५) ... ... | १२२—० |

**मंडळ्यांचे भाग**

(कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आंकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

| | |
|---|---|
| **बँका** | |
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १३८-१२ |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | १११-८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया (५०—२५) ८% . ... | ३०-१२ |
| इंपीरिअल बँक (५००) १२% ... ... | १५४७—८ |
| बॉंबे मॉ. को. बँक (५०) ५% ... ... | ५८—८ |
| रिझर्व्ह बँक (१००) ३½% ... ... | ११७—० |
| **रेल्वेज** | |
| दौंड-बारामती (१००) ४½% ... ... | १०२—० |
| पाचोरा-जामनेर (१००) ४½% ... ... | ९६—८ |
| अहमदाबाद प्रांतिज (५००) १२½% | ९२५—० |
| तापी व्हॅली (५००) ७½% ... ... ... | ७२२—८ |
| **वीज** | |
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. (५०) १३% ... ... | १२५—० |
| कराची (१००) ९% ... ... ... | २२२—८ |
| पुणें इलेक्ट्रिक (१००) ९% ... ... | २००—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. (१०००) ५½% ... ... | १३४६—४ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. (१०००) ७½% ... ... | १४२५—० |
| **इतर** | |
| बेलापूर शुगर (५०) ७ रु. ... ... ... | १५८—२ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट (१००-५०) २ रु. ... ... | ४४—८ |
| सिंदिया स्टीम (१५) १ रु. ... ... ... | १८—५ |
| न्यू इंडिया विमा (७५-१५) १ रु. ... | ३७-१० |
| ओरिएंटल विमा (२००) १२५ रु. ७५ रु. बोनस ... | ४,३५०—० |
| टाटा आयर्न प. प्रे. (१५०) ६% ... ... | २०६—४ |
| टाटा आयर्न दु. प्रे. (२००) १५ रु. २ आ. ... | १७२-१२ |
| टाटा आयर्न ऑर्डि. (७५) १० रु. ... ... | २२५—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड (३०) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | ९७५—० |

अप-टु-डेट शिलाई करतां
# महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा
बुधवार चौक, पुणें] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [खादी भांडाराचे माडीवर

**S. B. JOSHI & Co.**

ENGINEERS & CONTRACTORS

41 A. Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth. Poona City.

**पायोनियर डाइंग हाऊस, पुणें,**

रंगीत कापडाचें व चिटांचें व्यापारी.

पोशाक प्रिंटिंग, भर्डीकाम, पक्क्या रंगाचे छापकामाचा व रंगविण्याचा कारखाना.

भिकारदास मारुतीरोड, 'दातेवाडी' ३९१ सदाशिव पेठ.

**स्वल्प व्याजानें कर्ज मिळवा**

स्वदेशी धंद्यांना उत्तेजन देऊन त्यांची योग्य जोपासना करण्यास व स्वतःच्याहि फायद्यासाठी कंपनीचें लोन सर्टिफिकेट घेण्यास आजच रु. २४; किंवा प्रथम ६४८ व दरमहा ३ प्रमाणें पुढें १८ महिने भरून १०० ते ५००० कर्ज; अगर कर्ज नको असल्यास रु. ५ ते १०० रोख मिळवा. तसेंच स्पेशल लोन घेऊन निकडीच्या गरजा भागवा. या इन्व्हेस्टमेंटमध्यें गेल्या रकमा मिळविणें किती फायद्याचें होईल याचाहि विचार करा. प्रास्पेक्टस् व एजन्सीसाठी २ आण्याची तिकिटें पाठवून लिहा अगर भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**

हेड ऑफिसः—गिरगाव, मुंबई.

ब्रँचः—लक्ष्मी रोड, काकाकुवा मॅन्शन समोर, पुणें नं. २.

**दि साऊंड बँकिंग कॉर्पोरेशन लि.**

[ स्थापना सन १९३५ ]

९३।१ लक्ष्मीरोड, पुणें शहर

कामाची वेळः—

दररोज सकाळीं १० ते ३, शनिवारीं १० ते १

चालू ठेवी द. सा. द. शें. २ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

सेविंग्ज बँक ठेवींवर द. सा. द. शें. ३ टक्के व्याज दिलें जातें.

मुदतीच्या ठेवी ३ महिन्यांपासून ३ वर्षेपर्यंत स्वीकारल्या जातात. व्याजाचे दरांबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

कर्जः सोनें, चांदी, सरकारी रोखे, वगैरे तारणावर रकमा दिल्या जातात.

मॅनेजिंग एजंटस्.




पुणें एजंटः—ठाकूर देसाई आणि कं., बुधवार, पेठ, पुणें

अनुभविक पदवीधर वैद्याकडून मोफत तपासण्याची व्यवस्था.

सकाळीं ८ ते ९. सायंकाळीं ४॥ ते ५॥.

SAHYADRI INS. Co

NASIK

BEST TO CHOOSE & TO REPRESENT

WANTED WORKERS OF EITHER SEX.

Particulars by post or in person.

**संजीवन हेअर टॉनिक**

दारुणा, केंस गळणें व टक्कल

ह्यावर अनुभविक उपाय

संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद.




स्टॉकिस्ट : मा. गो. कुळकर्णी, किराणा मालाचे व्यापारी, पुष्करणी चौक, पुणें २

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठी भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना

**गेस्ट हाऊस**

टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपती चौक—पुणें.

हवेशीर जागा

सुग्रास भोजन

उत्तम आदरातिथ्य


पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. अनंत विनायक पटवर्धन यांनीं छापिलें, व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.